International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# वडगाव येथील श्री खंडोबा येथील यात्रा - एक ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. बजरंग वामन मोरे**

*सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, दहिवडी कॉलेज दहिवडी, ता. माण जि.सातारा*

*Corresponding Author –* डॉ. बजरंग वामन मोरे

DOI - 10.5281/zenodo.18709791

**प्रस्तावना :**

सातारा जिल्हाला ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरांचा मोठा वारसा लाभला असुन या जिल्हामध्ये वर्षभरामध्ये अनेक मोठया यात्रा भरतात या जिल्हामधील माण तालुकामध्ये ही अनेक गावांमध्ये यात्रा भरतात. या यात्रेला अनेक वर्षाची परंपरा आहे. या यात्रा म्हणजे गावातील व आजूबाजूच्या लोकांचे श्रध्दास्थान बनलेल्या आहेत. या यात्रामध्ये गावातील मुख्य दैवतेचे चे वर्षातून एकदा या यात्रेनिमित्त गावातील मंडळी एकत्र येवून हा उत्सव साजरा करत असतात. या यात्रा म्हणजे भारतीय समाजातील सामुहिक ऐक्याचे प्रतिक बनलेल्या आहेत.

**विषयाची निवड :**

स्थानिक इतिहास लेखनाच्या दृष्टिकोनातून समाजातील,तसेच गावातील परंपरा,उजेडात आणणे तसेच स्थानिक लोकांच्या ऐतिहासिक व धार्मिक श्रध्दास्थान असेलेल्या उत्सवाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उदिष्टे :**

1. सातारा व माण तालुक्यातील ऐतिहासिक व धार्मिक परंपराचा अभ्यास करणे
2. माण तालुक्यातील वडगाव गावातील यात्रेचा ऐतिहासिक अभ्यास करणे
3. वडगाव गावातील लोकांची यात्रेबद्दल असेलेली परंपरेचा अभ्यास करणे

**संशोधनाची मांडणी :**

दहिवडी फलटण रस्त्यावर दहिवडी पासुन अंदाजे पाच कि. मी. अंतरावर वडगाव हे गाव आहे. वडगाव बसस्थान का जवळ श्री. खंडोबा मंदिर आहे. जुने मंदिर आणि नवीन मंदिर अशी दोन मंदिरे श्री. खंडोबा ची पहावयास मिळतात. श्री. खंडोबा देवस्थान शासनाच्या पुरातत्व विभागाद्वारे 'ब' वर्गात आहे. हे देवस्थान या परिसरात खूप प्रसिध्द असून नवसाला पावणारा खंडोबा अशी ख्याती आहे. याच मंदिर परिसरात श्री. खंडोबा देवाचे पहिले पूजारी बापू यांची समाधी, श्री. बानूबाईचे छोटसे मंदिर, चौथरा,श्री दत्त मंदिर, इ. मंदिर पहावयास मिळतात. हे मंदिर परिसर भव्य,विकसित व सुभोभिणीय आणि रम्य परिसर आहे. यात्रेला हजारो भाविक येत असतात पण खंडोबाच्या वारा सह इतर वेळी म्हणजेच अमावस्येला हजारो भाविक दर्शनाला येत असतात.

सातारा जिल्हातील माण तालुक्यातील वडगाव येथील श्री. खंडोबा देवाची यात्रा दरवर्शी ऑक्टोबर महिन्यामध्ये भरत असते. एकादशी पासुन ते तेरशी पर्यत अशी तीन दिवस जंगी यात्रा भरत असते. यात्रेनिमित्त दिलेली माहिती मुलाखत : पुजारी दिलीप जाधव श्री. खंडोबाच्या आगमना /स्थापनेबद्दल पुजारी सांगातात की,

वडगावाचा एक भक्त पायी जेजूरीच्या खंडोबाची वारी अनेक वर्षे करीत होता. अनेक वर्षे या भक्ताने खंडोबाची मनोभावे पायी वारी केली. खंडोबा त्याला प्रसन्न झाला. आजे जे वडगाव मधील खंडोबाचे ठिकाण आहे मे मूळचे जेजूरीचे आहे. त्यावेळी ग्रामस्थांनी अगदी छोटसे मंदिर बांधले त्या मंदिराजवळ एक लिंबाचे झाड होते आजे ते लिंबाचे झाड आहे. छोटयाशा मंदिरानंतर गावकऱ्यांनी भाविकांच्या सढळ मदतीतून व वर्गणीतून मंदिर बांधले,हळूहळू नवसाला पावणारा खंडोबा म्हणून सर्वत्र ख्याती झाली. त्यामुळे भाविकांची संख्या बऱ्याच प्रमाणात वाढत गेली. भाविकांचीम दत व ग्रामस्थांनी वर्गणी मोठया प्रमाणात जमू लागली. त्यामुळे वडगाावकरांनी मंदिर दूसऱ्या ठिकाणी मोठया स्वरूपात बांधण्याचा निर्णय घेवून नवीन मंदिर उभारले. आज ज्या ठिकाणी मूळ मूर्ती व पूजा केली जाते ते मंदिर नव्याने उभारण्यात आलेले आहे. भाविकांची गर्दी व लोकांची श्रध्दा, प्रारंपारिक परंपरा विचारात घेवून शासनाने या देवस्थानाला ‘ब’ दर्जा दिलेला आहे. सध्या या मंदिराचे पूजारी दिलीप जाधव हे आहेत. साधारणपणे यात्रेची सुरूवात 1947 ला झाली असे पूजारी दिलीप जाधव यांनी सांगितले. ही यात्रा अश्विनी शुध्द एकादश बारस आणि तेरस अशी तीन दिवस असते.

यात्रेच्या पहिल्या दिवशी म्हणजेच एकादशी दिवसी रात्री 7 वाजता पालखी खंडोबा मदिरातून गावातील हनुमान मंदिरात वाजत गाजत आणली जाते. हनुमान मंदिरात पहाटे 4 वाजेपर्यत वाघ्यामुरळीचा अर्थात जागरण पार्टीचा बहारदार कार्यक्रम होतो. त्यानंतर गावातून छबिन्याचा कार्यक्रम सुरू होतो. पालखी चे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठया प्रमाणात गर्दी करीत असतात. सनई सुरात ही पालखी हळुहळु पुढे सरकत देवाचे पहिले पुजारी बापू संभू जाधव यांच्या घरी जाते. पूजाऱ्याच्या घरी देवाची गादी आहे. या गादीला श्री. खंडोबा देवाचा पालखी सोहळा थेट देतो. कारण वर्षभर देवाच्या मूर्ती या ठिकाणी असतात. फक्त यात्रेदिवशी या गादीवरील मुर्ती पुजाअर्चा करून मंदिरात नेतात आता देवाचे पुजारी बापू जाधव हयात नाहीत. त्यांचा नातू दिलीप जाधव आहेत. या गादीच्या भेटीनंतर पालखी सोहळा भाविक यात्रा कमिटी व गावकऱ्याच्या समवेत पुन्हा मंदिरात येतो. साधारणपणे हा पालखी सोहळा सकाळी 9 च्या दरम्यान श्री. खंडोबा देवाच्या मंदिरात पुन्हा येतो. लंगर तोडण्याचा कार्यक्रम होतो. सर्व धार्मिक कार्यक्रम मोठया उत्साहात आणि भावनिक वातावरणात साधारणपणे अकरापर्यत संपतात. त्यानंतर गजनृत्याचा कार्यक्रम सुरू होतो. 10 गावची गजीमंडळ यांचा बहारदार कार्यक्रम होतो. माण तालुक्यातील ही नावजलेली गजीमंडळे असतात. त्यांचा कार्यक्रम पाहण्यासठी भाविक मोठी गर्दी करतात. यावेळी भाविक गजी नृत्य खेळणाऱ्यास मोठया प्रमाणात बक्षीसे देतात. हजारो भाविक श्रीखंडोबाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. खंडोबा मंदिर यात्रेकरूने गजबजून जातो. संध्याकाळी महाप्रसादाचा मोठा कार्यक्रम होतो. गाव गर्दीने ओसाडून वाहते. या गावचे वैशिष्टे म्हणजे यात्रेला येणाऱ्या प्रत्येक भाविकांच्या जेवणाची सोय यात्रा कमिटी आणि वडगावकंर मोठया नियोजनाने करतात. अतिशय नियोजन आणि शिस्तबध्द यात्रा अशी ओळख वडगावकरांची आहे. पत्येक वर्षे ठरलेल्या दिवशी यात्रा घेतात. त्यात बदल कधीच झालेला नाही. या यात्रेमध्ये महाप्रसाद हा शाकाहारी व मांसाहारी असतो. यात्रेच्या तिसऱ्या दिवशी कुस्त्यांचा जंगी फड भरतो. महाराष्टातील नामांकित पैलवान वडगावच्या कुस्ती मैदानाला येत असतात. त्यानंतर रात्री करमणूकीचा कार्यक्रम होतो. या दिवशी यात्रेची

सांगता होते. तीन दिवसात विविध धार्मिक व करमणूकीचे कार्यक्रम पार पडत ही यात्रा मोठया उत्साहात साजरी होते.







**संदर्भ सूची :**


1. प्रत्यक्ष निरीक्षण : संशोधक डॉ. बजरंग मोरे दिनांक 05/10/2025
2. प्रत्यक्ष मुलाखत : पुजारी दिलीपी जाधव
3. सप्ताहिक : माण ऐक्य दिनांक 03/10/2025